# मिरा-भाईंदर महानगरपालिका

## पाणी पुरवठा व मलनि:सारण विभाग

## // प्रेसनोट //

दि.18/08/2025

सर्व नागरीकांना कळविण्यात येते की, मिरा-भाईंदर शहरास स्टेम प्राधिकरण व महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ (एम.आय.डी.सी.) प्राधिकरणाकडून पाणी पुरवठा करण्यात येतो.

पाणी पुरवठा योजनेच्या जांभुळ येथील जलशुद्धीकरण केंद्रातील अत्यंत महत्वाचे देखभाल दुरुस्तीचे काम करण्याकरीता महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळामार्फत (MIDC) २४ तासांचा शटडाऊन घेतला आहे. त्यामुळे महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाकडून (MIDC) मिरा-भाईंदर शहरास होणारा पाणी पुरवठा गुरुवार दि.२१/०८/२०२५ रोजी दुपारी १२:०० वा. ते शुक्रवार दि.२२/०८/२०२५ रोजी दुपारी १२:०० वाजेपर्यंत (एकुण २४ तास) पूर्णपणे बंद राहील. तसेच स्टेम प्राधिकरणाकडून होणारा पाणी पुरवठा सुरु राहणार आहे.

तरी महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाकडून (MIDC) होणारा पाणी पुरवठा पुर्ववत होईपर्यत मिरा-भाईंदर शहरास पाणी पुरवठा कमी दाबाने व उशीराने होईल. नागरीकांनी पाण्याचा वापर काटकसरीने करावा व महानगरपालिकेस सहकार्य करावे.

(शरद नानेगांवकर)
कार्यकारी अभियंता
पाणी पुरवठा व मलनि:सारण विभाग
मिरा-भाईंदर महानगरपालिका

Scanned with CamScanner